# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.11.2024** **वार – गुरुवार**

---

**नॅशनल बुक ट्रस्ट**

नॅशनल बुक ट्रस्टचं कार्यालय आता मुंबईऐवजी कायमस्वरूपी पुण्यात होणार आहे; त्यांना महानगरपालिकेच्या इमारतीतली एक जागा देखील तात्काळ भाड्याने दिली आहे, अशी माहिती आमदार चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात दिली. राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने यावर्षीचा पुस्तक महोत्सव येत्या 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित केला जाणार आहे. या पुस्तक महोत्सवाच्या कार्यालयाचं उद्घाटन आणि मांडवाचं भूमिपूजन पाटील यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. खासदार प्राध्यापक मेधा कुलकर्णी, न्यासाचे अध्यक्ष मिलिंद मराठे, महोत्सवाचे आयोजक राजेश पांडे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय पुस्तक न्यासाचं कार्यालय इथे होत असल्याने आता केवळ पुणे पुस्तक महोत्सवापुरतंच नाही; तर वर्षभर एनबीटीचं काम होणार आहे, असं पाटील म्हणाले. पुस्तक महोत्सवात मुलांना चित्रपट महोत्सवाबरोबरच कथाकथन आणि पुस्तक वाचन कट्टा निर्माण करण्याची सूचना मेधा कुलकर्णी यांनी केली.

**संजीवन समाधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचा 728वा संजीवन समाधी सोहळा आज आळंदीमध्ये अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पडला. या सोहळ्यासाठी गेल्या तीन दिवसांपासून अलंकापुरीत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले आहेत. आज माऊलींच्या समाधीवर दुग्धाभिषेक करण्यात आला. हरीभक्तपरायण नामदेव महाराजांचं संजीवन समाधी सोहळ्याचं कीर्तन झालं; त्यानंतर घंटानाद, पुष्पवृष्टी आणि आरती करण्यात आली. संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर फुलांची सजावट करण्यात आली आहे. समाधी मंदिरावर आज हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टीही करण्यात आली.

**ज्योतिराव फुले**

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त आज पुण्यात ठीकठिकाणी त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण केली. यानिमित्तानं पालिकेच्या वतीनं महात्मा जोतीराव फुले यांच्या जीवनावर आधारित 'मी जोतीराव फुले बोलतोय' हा एकपात्री नाट्य प्रयोग तसंच गीता गायनाचा कार्यक्रमही सादर करण्यात आला. पुणे शहर महिला कॉंग्रेस प्रभारी अध्यक्षा संगिता तिवारी यांनीही पुण्यातल्या समताभूमी इथल्या महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण केला. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने महात्मा फुले पुण्यतिथीनिमित्त आज अभिवादन मिरवणूक काढण्यात आली; यात हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

**समता पुरस्कार**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे दिला जाणारा ‘महात्मा फुले समता पुरस्कार, प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते नागराज मंजुळे यांना आज पुण्यात प्रदान करण्यात आला. समता परिषदेचे अध्यक्ष, आमदार छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली समता भूमी इथं हा पुरस्कार प्रदान सोहळा झाला. आज समाजात संकुचित विचार खूप वाढत आहे. आपण समतेचा विचार घेऊन पुढे जायला हवं, असं मत नागराज मंजुळे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**रासने**

पुण्यात दुचाकीस्वारासह सहप्रवाशाला हेल्मेट सक्ती केली जाणार असल्याच्या चर्चा गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहेत; त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी आज चर्चा केली. पुणे पोलिसांनी अशा प्रकारचे कोणतेही आदेश काढलेले नाहीत; हे आदेश महामार्गांसाठी वरिष्ठ स्तरावरून काढण्यात आले आहेत. पुण्यातील मध्यवर्ती भागात याचा परिणाम होणार नाही; आणि कारवाई देखील केली जाणार नाही असं पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी आपल्याला सांगितलं आहे; अशी माहिती हेमंत रासने यांनी दिली आहे.

**शाळांमध्ये अपार दिवस**

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्यातल्या सर्व विद्यार्थ्यांना अपार आयडी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने उद्या आणि परवा राज्यातल्या सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये अपार दिवस साजरा करण्याच्या सूचना शिक्षण विभागानं दिल्या आहेत. सर्व जिल्ह्यांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचे अपार आयडी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना राज्य प्रकल्प संचालक आर. विमला यांनी दिल्या आहेत.

**पुस्तक प्रकाशन**

मुलांना मार्गदर्शक ठरेल असं लेखन करणं ही काळाची गरज आहे; असं प्रतिपादन बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील यांनी आज पुण्यात केलं. शिक्षणतज्ज्ञ प्राध्यापक डॉक्टर राजेंद्र झुंजारराव यांनी लिहिलेल्या 'वंदन' या काव्यसंग्रहाचं प्रकाशन कृष्णकुमार पाटील आणि मसापचे कार्यवाह माधव राजगुरू यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. देशाच्या जडणघडणीमध्ये मोलाचं योगदान देणाऱ्या 40 क्रांतिकारकांवरच्या कविता या संग्रहामध्ये आहेत. तसंच संबंधित व्यक्तिरेखेचं पेन्सिलस्केचही रेखटण्यात आलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात थंडीचा कडाका वाढत असून आज पारा 9 अंशांपर्यंत खाली उतरला होतं; उद्याही किमान तापमान 10 अंशांच्या आसपास राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**